# काउंटडाऊन सुरु : कुणाचा गुलाल अन् कुणाचे फटाके आज होईल स्पष्ट

## उत्कंटा आणि धाकधूक वाढली / दुपारी 3 वाजेपर्यंत आठही आमदारांना होणार विजयमुकूट बहाल ?



*महासागर प्रतिनिधी*

*अमरावती,( दि.22 )- विधानसभा निवडणुकीच्या अनुषंगाने 23 नोव्हेबर रोजी सकाळी 8 वाजतापासून विद्यापीठ रोडवरील लोकशाही भवनात अमरावती व बडनेरा विधानसभा मतदारसंघातील मतदानाची मतमोजणी होणार आहे. मतमोजणीचे काउंटडाऊन सुरु झाले असून अवघ्या काही तासातच कुणाचा गुलाल आणि कुणाचे फटाके राहील हे स्पष्ट होईल. निकालाला घेवून मतदारांची उत्कंटा आणि धाकधूकही वाढलेली दिसत आहे. दूपारी 3 वाजेपर्यंत आठही मतदारसंघात कोणकोणाला आमदारकीचा विजय मुकूट बहाल होईल, हे दिसून पडेल.*

**लोकशाही भवनात मतमोजणीची तयारी पूर्ण**

विद्यापीठ मार्गावरील लोकशाही भवनात अमरावती आणि बडनेरा विधानसभा मतदारसंघाची मतमोजणी होणार आहे. पोस्टल बॅलेट, ईटीपीबीएमएस आणि ईव्हीएम वरील मतमोजणीची तयारी पूर्ण करण्यात आली आहे. विधानसभा सार्वत्रिक निवडणूक पार पडल्यानंतर शनिवार, दि. 23 नोव्हेंबर 2024 मतमोजणी होणार आहे. यासाठी आवश्यक उपाययोजना करण्यात आली आहे. अमरावती विधानसभा मतदारसंघातील 345 आणि 23 सहायक मतदानकेंद्रावर मतदान घेण्यात आले आहे. या सर्व मतदानकेंद्रावर ईव्हीएमद्वारे झालेले मतदान मतमोजणीकरीता प्रत्येक फेरीसाठी 14 टेबल, तसेच पोस्टल मतपत्रीकेची मतमोजणी करण्याकरीता 10 आणि ईटीपीबीएमएसकरीता 1 याप्रमाणे व्यवस्था करण्यात आली आहे. मतमोजणी वेळी याठिकाणी गर्दी होणार असल्याने पोलीस बंदोबस्त तैनात करण्यात आला आहे. निवडणूक आयोगामार्फत सौरभ स्वामी यांची मतमोजणी निरीक्षक म्हणून नेमणूक करण्यात आली आहे. मतमोजणी निरीक्षक मतमोजणी प्रक्रियेवर नियंत्रण ठेवून त्याची पाहणी करतील. मतमोजणीची माहिती देण्यासाठी मिडीया कक्ष स्थापन करण्यात आला आहे, असे निवडणूक निर्णय अधिकारी अनिल भटकर यांनी कळविले आहे.



### जिल्हाधिकाऱ्यांकडून मतमोजणी केंद्राची पाहणी



विधानसभा निवडणुकीसाठी लोकशाही भवनात मतमोजणी होणार आहे. मतमोजणी प्रक्रिया सुरळीत पाडावी, यासाठी जिल्हाधिकारी सौरभ कटियार यांनी मतमोजणी केंद्राला भेट देऊन आवश्यक असलेल्या तयारीची पाहणी केली. मतमोजणी केंद्राला त्री-स्तरीय सुरक्षा पुरवण्यात आली आहे. शनिवार, दि. 23 नोव्हेंबर रोजी मतमोजणीच्या दिवशी कोरडा दिवस घोषित करण्यात आला आहे. तसेच शस्त्राचा वापर प्रतिबंधित करण्यात आला आहे. सुरक्षिततेच्या दृष्टीकोनातून उमेदवार किंवा उमेदवाराचे प्रतिनिधी आणि मतमोजणी अधिकारी, कर्मचारी यांच्या व्यतिरिक्त इतर कोणालाही मतमोजणी स्थळाच्या 100 मीटर परिसराच्या आत प्रवेश देण्यात येणार नाही. तसेच निवडणूक निर्णय अधिकारी यांनी उमेदवार किंवा त्यांच्या प्रतिनिधींना अधिकृत पास दाखविल्याशिवाय प्रवेश देण्यात येणार नाही. लोकशाही भवनात मतमोजणी होणार असल्यामुळे बियाणी चौक ते विद्यापीठ रस्यासेवरील वाहतूक रस्ता वळविण्यात आली आहे. मतमोजणीच्या ठिकाणी झेरॉक्स, फॅक्स, ई-मेल इतर संपर्क साधनांच्या वापरावर प्रतिबंध करण्यात आला आहे. तसेच शंभर मीटर परिसरामध्ये मोबाईल फोन, वायरलेस सेट, ट्रांजिस्टर, कॅलक्युलेटर आदी प्रकारच्या साधनांच्या वापरावर प्रतिबंध घालण्यात आला आहे. मतमोजणी केंद्रापासून शंभर मीटरचा परिसर हा पादचारी क्षेत्र घोषित करण्यात आला आहे. या परिसरात निवडणूक कामाव्यतिरिक्त इतर वाहनांना प्रवेश देण्यात येणार नाही. सदर आदेशाचा भंग करणाऱ्या व्यक्तीविरूद्ध भारतीय नागरिक सुरक्षा संहितेनुसार कारवाई करण्यात येणार आहे,

### या ठिकाणी होणार मतमोजणी

| | |
|---|---|
| धामणगाव | - औद्योगिक प्रशिक्षण संस्था, चांदूर रेल्वे |
| बडनेरा | - लोकशाही भवन, विद्यापीठ रोड |
| अमरावती | - लोकशाही भवन, विद्यापीठ रोड. |
| तिवसा | - नवीन तहसील कार्यालय इमारत, |
| दर्यापूर | - कृषी उत्पन्न बाजार समिती |
| मेळघाट | - नवीन प्रशासकीय इमारत, धारणी, |
| अचलपूर | - कल्याण मंडपम, परतवाडा |
| मोर्शी | - शासकीय धान्य गोदाम, मोर्शी |

### कुणाला मिळणार विजश्री

अमरावती जिल्ह्यातील विधानसभा निवडणूकीच्या आठ मतदार संघातून अनेक दिग्गज उमेदवार रिंगणात आहेत. अमरावतीमधील डॉ. सुनिल देशमुख, सुलभा खोडके, जगदिश गुप्ता, अलीम पटेल, बडनेरातील रवि राणा, प्रिती बंड, तुषार भारतीय, सुनिल खराटे, धामणगावातील प्रताप अडसड, विरेंद्र जगताप, निलेश विश्वकर्मा, अचलपूरातील बच्चु कडू, बबलु देशमुख, प्रविण तायडे, मेळघाटातील राजकुमार पटेल, केवलराम काळे व डॉ. हेमंत चिमोटे, तिवस्यातून यशोमती ठाकुर, राजेश वानखडे, दर्यापुरातील अभिजित अडसुळ, मोर्शीत देवेंद्र भुयार, उमेश यावलकर, गिरीश कराळे व विक्रम ठाकरे अशा आदी दिग्गज उमेदवारांपैकी कुणाला विजयश्री मिळणार हे मतमोजणीअंती निश्चित होईल.

### मतमोजणी केंद्राला त्री-स्तरीय सुरक्षा

विधानसभा निवडणुकीसाठी लोकशाही भवनात मतमोजणी होणार आहे. मतमोजणी प्रक्रिया सुरळीत पाडावी, यासाठी जिल्हाधिकारी सौरभ कटियार यांनी मतमोजणी केंद्राला भेट देऊन आवश्यक असलेल्या तयारीची पाहणी केली. मतमोजणी केंद्राला त्री-स्तरीय सुरक्षा पुरवण्यात आली आहे. मतमोजणीच्या दिवशी कोरडा दिवस घोषित करण्यात आला आहे. तसेच शस्त्राचा वापर प्रतिबंधित करण्यात आला आहे. सुरक्षिततेच्या दृष्टीकोनातून उमेदवार किंवा उमेदवाराचे प्रतिनिधी आणि मतमोजणी अधिकारी, कर्मचारी यांच्या व्यतिरिक्त इतर कोणालाही मतमोजणी स्थळाच्या 100 मीटर परिसराच्या आत प्रवेश देण्यात येणार नाही. तसेच निवडणूक निर्णय अधिकारी यांनी उमेदवार किंवा त्यांच्या प्रतिनिधींना अधिकृत पास दाखविल्याशिवाय प्रवेश देण्यात येणार नाही.



### मतमोजणी केंद्रासह शहरात पोलिसांचा कडेकोट बंदोबस्त

मतमोजणीकरीता पोलीस आयुक्तालयातून 3 पोलीस उपायुक्त, 5 सहायक पोलीस आयुक्त, 23 पोलीस निरिक्षक, 48 सहायक पोलिस निरीक्षक व उपनिरीक्षक, 676 पोलीस अंमलदार असे एकूण 755 अधिकारी व अंमलदार, यासोबतच सीएपीएफ, एसएपीच्या 3 कंपन्या व 2 प्लॉटून नेमण्यात आले आहे. याशिवाय शहरात सर्व पोलिस ठाण्याच्या हद्दीत ठिकठिकाणी फिक्स पॉईंट व आर सी.पी. व जलद प्रतिसाद पथक नेमण्यात आलेले आहे. मतमोजणीच्या अनुषंगाने पोलीस आयुक्त सर्व नागरीकांकरीता नियमावली व सुचना जारी केल्या आहेत. यामध्ये मतमोजणीचे वेळी लोकशाही भवन, विद्यापीठ रोड, अमरावती समोरील अमरावती मार्डी व मार्डी- अमरावती मार्गाने होणारी वाहतूक पर्यायी मार्गाने वळविण्यात आलेली आहे. त्यावेळी, नागरीकांनी कोणतेही वाहन नमुद मार्गाने ये-जा करणार नाही. याची दक्षता घ्यावी व पर्यायी मार्गाचा वापर करावा. याबाबत वेगळी अधिसुचना जारी करण्यात आली आहे. लोकशाही भवन, विद्यापीठ रोडचे 100 मीटरचे आत उमेदवार व त्यांचे प्रतिनिधी यांना सुध्दा अधिकृत ओळख पत्राशिवाय प्रवेश मिळणार नाही. आयुक्तालय कार्यक्षेत्रात मतमोजणीचे दिवशी जमावबंदी आदेश पारित करण्यात आला आहे. लोकशाही भवन रोडवर प्रवेश पत्र धारक यांनी त्यांचे वाहने कृषी संवर्धन कार्यालय येथे केलेल्या पार्किग व्यवस्थेच्या ठिकाणी पार्क करावी. 100 मिटरचे आत येणा-या पासधारकांना मोबाईल, स्मार्ट वॉच, कॅमेरा तसेच इतर कोणतेही प्रसार साधने सोबत बाळगता येणार नाही. 100 मिटरचे आत येणा-या पासधारकांना सुध्दा कोणत्याही प्रकारचे फटाके, स्फोटक पदार्थ तसेच जिवीत हानी / मालमत्तेचे नुकसान होईल अशा प्रकारचे इतर तत्सम साहित्य, लाठी, काठी शस्त्रे बाळगता येणार नाही. मतमोजणी निकाल जाहीर झाल्यानंतर कोणीही प्रतिस्पर्ध्यांबाबत आक्षेपार्ह विधाने व घोषणाबाजी करणार नाही. आचार संहिता लागु असल्यामुळे विजयी उमेदवाराची विजयी मिरवणूक काढतांना नियमाप्रमाणे सबंधीत विभागाकडून परवानगी घेणे आवश्यक असून आचार संहितेचे भंग झाल्यास नियमाप्रमाणे कायदेशीर कार्यवाही करण्यात येईल. या सुचना व नियमांचे सर्व नागरीकांनी काटेकोर पालन करून पोलीस विभागास सहकार्य करण्याबाबत पोलिस आयुक्त नविनचंद्र रेड्डी यांनी आवाहन केलेले आहे.

### असा राहणार पोलीस बंदोबस्त

मतमोजणीकरीता अमरावती शहर येथून 3 पोलीस उपायुक्त, 5 सहायक पोलीस आयुक्त, 23 पोलीस निरिक्षक, 48 सहायक पोलिस निरीक्षक व उपनिरीक्षक, 676 पोलीस अंमलदार असे एकूण 755 अधिकारी व अंमलदार, यासोबतच सीएपीएफ, एसएपीच्या 3 कंपन्या व 2 प्लॉटून नेमण्यात आले आहे. याशिवाय शहरात सर्व पोलिस ठाण्याच्या हद्दीत ठिकठिकाणी फिक्स पॉईंट व आर सी.पी. व जलद प्रतिसाद पथक नेमण्यात आलेले आहे.

### ओळखपत्राशिवाय प्रवेश नाही

लोकशाही भवन परिसरातील 100 मीटरचे आत उमेदवार व त्यांचे प्रतिनिधी यांना सुध्दा अधिकृत ओळख पत्राशिवाय प्रवेश मिळणार नाही. पोलीस आयुक्त यांचे आदेशाने पोलीस आयुक्तालय कार्यक्षेत्रात मतमोजणीचे दिवशी जमावबंदी आदेश पारित करण्यात आला आहे. लोकशाही भवन येथे प्रवेश पत्र धारक यांनी त्यांचे वाहने कृषी संवर्धन कार्यालय येथे केलेल्या पार्कीग व्यवस्थेच्या ठिकाणी पार्क करावी. 100 मिटरचे आत येणा-या पासधारकांना मोबाईल, स्मार्ट वॉच, कॅमेरा तसेच इतर कोणतेही प्रसार साधने सोबत बाळगता येणार नाही. पासधारकांना सुध्दा कोणत्याही प्रकारचे फटाके, स्फोटक पदार्थ तसेच जिवीत हानी / मालमत्तेचे नुकसान होईल अशा प्रकारचे इतर तत्सम साहित्य, लाठी, काठी शस्त्रे बाळगता येणार नाही. मतमोजणी निकाल जाहीर झाल्यानंतर कोणीही प्रतिस्पर्धीबाबत आक्षेपार्ह विधाने व घोषणाबाजी करणार नाही.

### ग्रामीणमध्ये 934 पोलीस अंमलदार तैनात

आगामी विधानसभा सार्वत्रीक निवडणुक 2024 ची मतमोजणी निष्पक्ष पारदर्शक व भयमुक्त वातावरणात पार पडावी. याकरीता अमरावती ग्रामीण पोलीस घटकामध्ये निवडणुक संबंधाने मार्गदर्शक सुचनांनुसार बंदोबस्त नेमण्यात आलेला आहे. अमरावती ग्रामीण घटकामध्ये एकुण 6 विधानसभा मतदार संघ असुन त्यामध्ये (1) धामणगाव रेल्वे मतदार क 36 (2) तिवसा विधानसभा मतदार संघ क 39 (3) दर्यापुर विधानसभा मतदार संघ क 40 (4) मेळघाट विधानसभा मतदार संघ क 4 (5) अचलपुर विधानसभा मतदार संघ क 42 (6) मोर्शी विधानसभा मतदार संघ क 43 असे एकुण 06 विधानसभा मतदार संघ असुन त्यानुसार खालिल प्रमाणे मतमोजणी बंदोबस्त नेमण्यात आलेला आहे. त्याकरीता 93 पोलीस अधिकारी, 934 पोलीस अंमलदार, आणी एकुण 03 एसआरपीएफ प्लाटुन, 03 आरपीसी प्लाटुन, वायरलेस संच, वॉकिटॉकी, छ्स्नस्छ, ॥।स्छ व सुसज्य वाहनांसह कायदा व सुव्यवस्था अबाधित राखण्याच्या दृष्टिकोणातुन बंदोबस्त नेमण्यात आलेला आहे.

# मतमोजणी च्या पुर्वसंध्येला शहरात दोन हत्या

## शोभा नगरमध्ये 19 वर्षीय तरुणाची हत्या | प्रभादेवी मंगलकार्यालयाजवळ आढळला मृतदेह

**महासागर प्रतिनिधी**

**अमरावती,( दि.22 )-** विधानसभा मतमोजणीच्या अनुषंगाने सर्वत्र अलर्ट असताना शहरात शुक्रवारी काही तासांच्या अंतराने झालेल्या दोन हत्यांनी शहर हादरले. यातील एक घटना गाडगे नगर पोलीस स्टेशनअंतर्गत शोभा नगरमध्ये तर दुसरी घटना राजापेठ पोलीस स्टेशनअंतर्गत प्रभादेवी मंगलकार्यालयाजवळ घडली. गेल्या महिन्यातच सलग आठ हत्येच्या घटनांनी शहर हादरले असताना पुन्हा या हत्यांची मालिका शहर पोलिसांच्या कार्यशैलीवर प्रश्नचिन्ह उभे करित आहे.





**रात्री वाद, सकाळी हत्या**

गाडगे नगर पोलीस स्टेशन हद्दीतील शोभा नगर परिसरात एका तरुणाची धारदार चायना चाकूने हल्ला करून हत्या करण्यात आली. रोहित रतनलाल पाल (19) असे मृताचे नाव आहे. यप्रकरणात तीन आरोपींविरुध्द गाडगेनगर पोलिसांनी गुन्हा नोंदविला असून, पोलिस त्यांचा शोध घेत आहेत. गुन्हेगारी पार्श्वभूमीचे संबंध असलेल्या रोहीत व अनिल सोळंके या दोघांमध्ये काही कारणावरून गुरुवारी वाद झाला होता. या जुन्या वैमनस्यातून रोहीतची हत्या झाल्याची शक्यता वर्तविण्यात येत आहे. शुक्रवारी रोहीत हा शोभा नगराजवळील लक्ष्मीनगर चौकातील एका पानटपरीवर उभा होता. त्यावेळी दुचाकीवर आलेल्या तीन जणांनी अचानक रोहीतवर चाकूने वार केले आणि तेथून पलायन केले. या घटनेनंतर गाडगे नगर पोलिसानी घटनास्थळी जाऊन रोहीतला तत्काळ जिल्हा सामान्य रुग्णालयात नेले. त्यावेळी त्याला मृत घोषीत करण्यात आले. याप्रकरणात मयूर सोळंके (21), अनिल सोळंके (21) व दुर्गेश सोळंके (22) यांची नावे पुढे आली आहे. पोलिसांना हत्येत वापरलेल्या चाकूचे कव्हर सापडले असून ते फॉरेन्सिक तपासणीसाठी प्रयोगशाळेत पाठवण्यात आले आहे.

राजापेठ हद्दीतील दस्तुरनगर जवळील प्रभादेवी मंगल कार्यालयाजवळ एका तरुणाची हत्या झाल्याची घटना रात्री 10.30 वाजता पुढे आली आहे. त्याच्या पोटात धारदार चाकुचे वार केले आहे. अब्दुल आकिब अब्दुल वहाब (रा.नालसाहाबपूरा पठान चौक) असे मृतक युवकाचे नाव सांगितले जात आहे.

**एसीपीसह क्राईमची टिम घटनास्थळी**

घटनेची माहिती मिळताच एसीपी अरुण पाटील, गुन्हे शाखेचे पीआय गोरखनाथ जाधव, पीआय आशाराम चोरमले हे त्यांच्या पथकासह घटनास्थळी पोहोचले. यावेळी पोलिसांनी घटनास्थळाचा तपास करून हत्येचे कारण जाणून घेण्याचा प्रयत्न केला.

# गोंधळ घातल्याप्रकरणी 50 लोकांवर गुन्हे

## राजीव गांधी महाविद्यालय मतदान केंद्रावरील घटना

**महासागर प्रतिनिधी**

**अमरावती,( दि.22 )-** बुधवारी 20 नोव्हेंबर रोजी सायंकाळी मतदान प्रक्रिया आटोपल्यानंतर, ईव्हीएम मशीन दुचाकीवर नेल्याप्रकरणी गोपाल नगर परिसरातील राजीव गांधी महाविद्यालयात उभारलेल्या मतदान केंद्राबाहेर गोंधळ झाला, यानंतर या मतदान केंद्रावर अपक्ष उमेदवार प्रीती बंड, तुषार भारतीय यांच्यासह हजारो नागरिकांची गर्दी केली होती. त्यामुळे मतदान केंद्रावरील अधिकारी व कर्मचाऱ्यांना बराच वेळ मतदान केंद्रात ताटकळत रहावे लागले. या घटनेबाबत राजापेठ पोलीस ठाण्यात 50 हून अधिक जणांवर गुन्हे दाखल करण्यात आले. या संपूर्ण प्रकरणाबाबत जिल्हा निवडणूक अधिकारी तथा जिल्हाधिकारी सौरभ कटियार यांनी 20 नोव्हेंबरच्या रात्रीच स्पष्टीकरण जारी करून सर्व मतदान केंद्रातील सर्व ईव्हीएम पूर्णपणे सुरक्षित असल्याचे स्पष्ट केले. ईव्हीएममध्ये कोणत्याही प्रकारची छेडछाड झालेली नाही आणि सर्व ईव्हीएम मशीन सुरक्षितपणे स्ट्राँग रूममध्ये नेण्यात आल्या आहेत. या संपूर्ण प्रकरणाची अतिशय गंभीर भूमिका घेत जिल्हा धिकारी सौरभ कटियार यांनी बडनेरा मतदारसंघाचे आरओ विवेक जाधव यांना या संपूर्ण प्रकरणाची चौकशी करून तातडीने अहवाल सादर करण्याचे आदेश दिले आहेत. मतदान केंद्रावर निवडणूक कर्तव्यासाठी तैनात असलेल्या व्यक्तीनेही कर्तव्यात कसूर केल्याचे आढळून आल्यास त्याच्यावरही कडक कारवाई करण्यात येईल, असे या आदेशात म्हटले आहे. त्याचबरोबर मतदान केंद्रावर विनाकारण गोंधळ घालणाऱ्यांवर कारवाई करण्याच्या सूचनाही जिल्हाधिकाऱ्यांनी पोलिस विभागाला दिल्या आहेत. त्यामुळे राजापेठ पोलिसांनी शासनाच्या वतीने तक्रारदार बनलेल्या 50 हून अधिक जणांविरुद्ध जमावबंदी कायद्याचे उल्लंघन करून गोंधळ घालणे, शासकीय कामात अडथळा निर्माण केल्याप्रकरणी गुन्हा दाखल केला आहे.

आरएनआय ४६९७५/१९८५ महासागर अमरावती

मालक, मुद्रक, प्रकाशक श्रीकृष्ण तनसुखदास चांडक यांनी अरूणोदय प्रेस, कॉटन मार्केट, नागपूर १८ येथे छापून दैनिक महासागर कार्यालय, होटल टूरिस्टच्या बाजूला रेल्वे स्टेशन चौक, अमरावती येथे प्रकाशित केले. संपादक -श्रीकृष्ण तनसुखदास चांडक ( पीआरबी कायद्यानुसार संपादकीय जबाबदारी यांच्यावर राहील ) अमरावती मुख्य कार्यालय, पत्ता. दैनिक महासागर, होटल टूरिस्टच्या बाजूला रेल्वे स्टेशन चौक अमरावती, फोन नं. ९५१८९३४५०४

# मेळघाटात कोण मारणार बाजी!

## तिरंगी लढतीतील उमेदवारांचे दावे-प्रतिदावे | तिघेही सांगतात 'गुलाल आमचाच'

**महासागर प्रतिनिधी**

*पथ्रोट,( दि.22 ) - यंदाच्या विधानसभा निवडणुकीत आदीवासी बहुल भागातील मेळघाट मतदार संघात भरभरुन मतदारांनी मतदान केले. महायुती, महाविकास आघाडी, प्रहार निर्मीत तिसर्यी आघाडीसह उमेदवारात तिरंगी काट्याची टक्कर झाली. उमेदवारांचे भवितव्य सिलबंद झाल्यानंतर आपणच विजयी होणार दावे-प्रतिदावे करीत पेढे आणि गुलाल आमचाच राहणार असल्याचा दावा केला जात आहे.*





भाजपा कडुन निवडुन आल्यानंतर प्रहार कडुन नशीब फडफडल्यानंतर प्रहार कडुन आमदारकी पदरात पाडली असता राजकुमार पटेल पुन्हा बाजी मारणार की पुर्वीचे काँग्रेसवासी वर्तमान महायुतीचे केवलराम काळे आमदार होणार. की परिवर्तन हा सृष्टीचा नियम असताना काँग्रेसचे डॉ.हेमंत चिमोटे यांना संधी मिळणार या कडे सर्वांचे लक्ष लागलेले आहे. आज(शनिवारी) होणार्याप मतमोजणीत निकाल स्पष्ट होईल. आधी भाजपाकडुन विजयी व नंतर पराभुत झाल्यावर अपक्ष (प्रहार जनशक्ती) कडुन विद्यमान आमदार राजकुमार पटेल यांच्या समोर भाजपाने केवलराम काळे, काँग्रेसचे डॉ.हेमंत चिमोटे यांचे कडवे आव्हान होते. प्रत्यक्ष प्रचारा दरम्यान मतदारांच्या भेटी, रॅली, सभा पार पडल्या. बुधवारी मतदारांनी मोठ्या प्रमाणात मतदान केले, जिल्हाभरात मेळघाट विधानसभा मतदार संघाची मतदानाची टक्केवारी सर्वाधिक आहे. वाढलेली मतं कुणाच्या पारड्यात पडली, हे अजुन निश्चीत नाही. काँग्रेसचा नवखा उमेदवार डॉ.हेमंत चिमोटे यांचाही मतदारांवर प्रभाव पडल्याचे दिसुन आले. निकालाआधी पदाधिकारी, कार्येकर्ते कडुन दावे-प्रतिदावे सुरु झाले आहेत. या तिरंगी लढतीत कोण बाजी मारेल हे आज स्पष्ट होईल.

# आज 25 फेऱ्यातून ठरणार नविन आमदार

## मतमोजणी : दर्यापूरात प्रशासन सज्ज

**महासागर प्रतिनिधी**

**दर्यापूर,( दि.22 )-** दर्यापूर विधानसभा मतदारसंघात 342 मतदान केंद्रावर मतदान प्रक्रीया पार पडली. आता सर्वांना केलेल्या मतदानाच्या निर्णयाची उत्सुकता लागली आहे. शहरातील दर्यापूर-अकोट मार्गालगतच्या कृषी उत्पन्न बाजार समितीमधील स्ट्रॉंगरूममध्ये उद्या शनिवार (दि.22) मतमोजणी होणार आहे. 25 फेऱ्यानंतर दर्यापूर मतदारसंघाचे नविन आमदार कोण ते ठरणार आहे.



महसूल व पोलीस प्रशासन मतमोजणी प्रक्रीयेकरिता सज्ज झाले आहे. सकाळी 8 वाजतापासून मतमोजणीच्या 14 टेबल्सवरून 25 फेरीद्वारे दुपारपर्यंत संपूर्ण निकाल घोषित होईल. अशी माहिती निवडणूक निर्णय अधिकारी तथा एसडीओ राजेश्वर हांडे यांनी दिली. अनुसूचित जातीकरीता राखीव असलेल्या दर्यापूर विधानसभा मतदारसंघाकरीता एकूण 16 उमेदवार रिंगणात आहेत. बुधवारी पार पडलेल्या मतदान प्रक्रीयेदरम्यान 66.84 टक्के एकूण मतदान झाले. दरम्यान 14 टेबलवर मतमोजणी होणार असून प्रत्येक टेबल मागे पर्यवेक्षक, सहाय्यक, सुक्ष्म अधिकारी आदी असे एकूण 48 जण असणार आहेत. या निवडणुकीसाठी सर्व राजकीय पक्षांमधील स्थानिक नेत्यांनी आपल्या उमेदवाराच्या विजयासाठी अथक परिश्रम घेतले आहे, उमेदवारांनी मात्र देव पाण्यात घालून मतमोजणीकडे आपले डोळे लावले आहे. उपविभागीय पोलीस अधिकारी गायकवाड यांच्या नेतृत्वाखाली ठाणेदार वानखडे हे पूर्ण बंदोबस्तावर लक्ष ठेवून राहतील.

## माणिकराव पवार यांचे निधन

**हिवरखेड-** येथील माजी उपसरपंच श्री मंगेश माणिकराव पवार यांचे वडील माणिकराव शामरावजी पवार यांचे वयाच्या (69) व्या वर्षी दि. 17 नोव्हेंबर 2024 रोज रविवारला हृदय विकाराच्या तिव्र झटक्याने निधन झाले. त्यांचेवर निर्मिक स्मशानभूमीत अंत्यसंस्कार करण्यात आले. त्याचे मागे पत्नी, दोन मुले, एक सुन, पाच भाऊ,नातु व नातवंडे असा बराच मोठा आप्त परिवार आहे.




# डॉ. पंजाबराव देशमुखांचे स्वप्न भंग झाल्यासारखं वाटतय!

## वॉटसअप स्टेटस ठेवून एका प्राध्यापकाने उघड केला महाविद्यातील भोंगळ प्रकार

**महेश बुंदे**

**दर्यापूर, ( दि.22 )-** महाविद्यालयातील अस्वच्छता आणि परिक्षेदरम्यान चालणाऱ्या नकलेच्या प्रकाराचा व्हिडीओ आपल्या वॉटसअप स्टेटसला ठेवून 'डॉ. पंजाबराव देशमुख यांच स्वप्न भंग झाल्यासारखं वाटतय', असे म्हणत एका प्राध्यापकांनी येथील जे. डी. पाटील सांगळूदकर कला, वाणिज्य, विज्ञान महाविद्यालयातील भोंगळ कारभारा पुन्हा एकदा चव्हाट्यावर आणला आहे.

शिक्षण महर्षी भाऊसाहेब उपाख्य डॉ.पंजाबराव देशमुख यांनी गावागावात ज्ञानाची गंगा पोहोचविण्याकरिता श्री शिवाजी शिक्षण संस्थेची स्थापना केली. या संस्थेच्या माध्यमातून ही संस्था शिक्षण प्रसारणाचे उत्तम कार्य करित आहेत, मात्र



काही प्राचार्यांचा बेजबाबदारपणा महाविद्यालयाची दुर्दशा होताना दिसत आहे. असा प्रकार येथील जे. डी. पाटील सांगळूदकर कला, वाणिज्य, विज्ञान महाविद्यालयात उघडकीस आला आहे. हिवाळी-2024 संत गाडगे बाबा अमरावती विद्यापीठ परीक्षेदरम्यान येथे मोठ्याप्रमाणात नक्कल चालत असल्याचा प्रकार महाविद्यालय तील शौचालयातील व्हिडीओने उघडकिस आणला आहे. इतकेच नव्हे तर अत्यंत घाणेरड्या अशा शौचालयाची परिस्थितीही या व्हिडीओच्या माध्यमातून बाहेर आणली आहे. दिवसाकाठी मिटिंगचे आयोजन करून प्राध्यापकांचा वेळ घालवण्यात प्राचार्य दिसुन येतात. त्यामुळे विद्यार्थ्यांचे वर्ग बुडतात. अनेक विद्यार्थ्यांनी सांगितले की, आमच्या तासिका नियमित होत नाहीत. प्राध्यापक शिकवणी वर्ग घेत नाहीत. अभ्यास क्रम पूर्ण करत नाहीत. याकडे वरिष्ठ अधिकाऱ्यांनी लक्ष घालणे फार गरजेचे झाले आहे.

# परतवाडा मार्गावर कारचा अपघात

**अमरावती -** मेळघाटमधून तीन दिवसीय निवडणूक कर्तव्य बजावून मध्यरात्री 2 वाजतानंतर अमरावतीकडे येत असताना एका कारचा अपघात झाला. अमरावतीच्या दिशेने येत असताना पहाटे 4 वाजताच्या सुमारास परतवाडापासून चार किलोमीटर अंतरावर ही कार अपघातग्रस्त झाली.

अमरावती येथील दीपक चर्जन यांच्या मालकीचे हे वाहन असल्याचे सांगण्यात येत आहे. सुदैवाने या अपघातात कुणालाही गंभीर इजा झाली नाही. कारमधील सर्व चारही निवडणूक कर्मचारी सुरक्षित बाहेर पडले.

# शौचास बसल्याच्या कारणाहून दोन गटात धुमश्चक्री

## खोलापुरात परस्परविरोधी तक्रार | आठ जणांवर गुन्हे

**महासागर प्रतिनिधी**

**अमरावती,( दि.22 ) -** नदीकाठी शौचास बसलेल्या जावायास मारहाण केल्याने दोन गटात धुमश्चक्री झाल्याची घटना खोलापूर येथे घडली. याप्रकरणी पोलिसांनी परस्परविरोधात दिलेल्या तक्रारीवरुन गुन्हे दाखल करण्यात आले आहे.

पोलिस तक्रारीनुसार, खोलापूर पोलिस ठाण्याच्या हद्दीतील खोलापूर पांढरी येथे कुटुंबाकडे मुलीसह जावई दाखल झाला. नेहमीच्या सवयीनुसार त्यांनी नदीचा काठ गाठला आणि तेथे मोकळे होण्याचा प्रयत्न केला असतानाच काही ग्रामस्थांनी त्यांना हटकले. येथे शौचास बसू नको, असे म्हणत केस ओढले आणि उजव्या हाताला फावड्याने प्रहार केला. याशिवाय शिवीगाळ केल्याचे तक्रारीत नमूद आहे. या जावईबुवांच्या सासूबाईंनी पोलिसात तक्रार दाखल केली. चौघांविरुद्ध खोलापूर पोलिसांनी गुन्हा दाखल केला. याच प्रकरणात गुन्हा दाखल झालेल्या कुटुंबातील 30 वर्षीय युवकाने खोलापूर पांढरी येथे आलेला जावई, मुलगी, आई व अन्य एक महिला अशा चौघांकडून मारहाण झाल्याची तक्रार दाखल केली. गुरे नदीकाठी चरत असताना जावईबापू शौचास बसले होते. त्यामुळे त्यांना हटकले.

हे प्रकरण माहिती होताच. माझ्या जावयाला का हटकले, असे म्हणत महिलेने तेलाची किटली फेकून मारली तसेच तिच्यासमवेत असलेल्या अन्य महिलेने हातावर फावडे मारून जखमी केले, असे तक्रारीत नमूद आहे. या तक्रारीवरून खोलापूर पोलिसांनी चौघांविरुद्ध गुन्हा नोंदविला.

# मायलेकाला जाळणाऱ्या त्या आरोपीचा मृत्यू

## विष प्राशन केल्यानंतर 8 दिवसांनी सोडले प्राण

**महासागर प्रतिनिधी**

**अमरावती,( दि.22 ) -** आई व मुलाला जाळून स्वतऱ्हा आत्महत्येचा प्रयत्न करणाऱ्या आरोपीचा अखेर आठ दिवसानंतर उपचारदरम्यान मृत्यू झाला. ही घटना 21 नोव्हेंबर रोजी उघडकीस आली होती. मंगेश मेश्राम (रा. पिंपळखुटा) असे मृतकाचे नाव आहे. शेजारी राहणाऱ्या मंगेश मेश्रामने रात्रीच्या वेळी झोपलेल्या अवस्थेत असलेल्या नंदा जानराव मेश्राम व मुलगा नितीन जानराव मेश्राम यांच्यावर पेट्रोल फेकून आग पेटविले होते. त्यानंतर त्यानेही स्वत: विष प्राशन करून आत्महत्येचा प्रयत्न केला. या आगीत नंदा मेश्राम यांचा मृत्यू झाला, तर नितीन मेश्राम हा सुध्दा 50 टक्के भाजल्या गेला. त्याला नागपूर येथे उपचाराकरिता दाखल करण्यात आले. त्याची प्रकृती गंभीर असल्याचे सांगण्यात येत आहे. तसेच अमरावती येथे भरती असलेला आरोपी मंगेश मेश्राम याचा आठ दिवसानंतर गुरुवारी सकाळी उपचारादरम्यान मृत्यू झाला. या घटनेचा पुढील तपास मंगरूळ पोलिस स्टेशनचे ठाणेदार गौतम इंगळे यांच्या मार्गदर्शनाखाली सुरू आहे.

# मराठी भाषा विद्यापीठात प्रवेश प्रक्रियेस प्रारंभ

**महासागर प्रतिनिधी**

**रिद्धपूर, ( दि.22 ) -** रिद्धपूर येथील मराठी भाषा विद्यापीठात पदव्युत्तर पदवी अभ्यासक्रमांसाठीची प्रवेश प्रक्रिया सुरू झाली असून, पात्र विद्यार्थ्याकडून ऑनलाइन पध्दतीने अर्ज मागविण्यात येत आहे.

कला व साहित्य प्रशाला, अंतर्गत अभिजात भाषा व मध्ययुगीन मराठी वाड्.मय विभाग, एम.ए. (अभिजात मराठी भाषा आणि साहित्य) या अभ्यासक्रमासाठीची प्रवेश प्रक्रिया सुरू करीत आहे. या अभ्यासक्रमाचा कालावधी दोन वर्षांचा असून, हा अभ्यासक्रम



नवीन राष्ट्रीय शैक्षणिक धोरण - 2020 आराखड्यानुसार राहील. या अभ्यासक्रमासाठीची प्रवेश क्षमता 60 असून, मान्यताप्राप्त विद्यापीठाच्या कोणत्याही शाखेतील पदवीधर असणे आवश्यक आहे. ऑनलाइन अर्ज करण्याची अंतिम मुदत 27 नोव्हेंबर असून, संबंधितांनी आपले अर्ज ऑनलाइन पध्दतीने करावेत.

शासनाच्या नियमानुसार गुणवत्तेवर आधारित प्रवेश प्रक्रिया राबविली जाणार असून, 2 डिसेंबरपासून प्रथम सत्र सुरू होणार आहे. अधिक माहितीसाठी अमरावती संपर्क कार्यालय सहसंचालक (उच्च शिक्षण कार्यालय, शासकीय ज्ञान विज्ञान संस्था) राम राठोड यांच्याशी संपर्क साधण्याचे आवाहन कुलसचिवांनी केले आहे.

# पीडीएमसीमध्ये पहिले किडनी प्रत्यारोपण यशस्वी

## बहिणीने किडनी देवून वाचविले भावाचे प्राण

**महासागर प्रतिनिधी**

**अमरावती,( दि.22 ) -** स्थानिक डॉ.पंजाबराव उपाख्य भाऊसाहेब देशमुख स्मृति वैद्यकीय महाविद्यालय येथे पहिली किडनी ट्रान्सप्लांट शस्त्रक्रिया यशस्वीरित्या पूर्ण झाली. भुसावळ येथील मध्यमवर्गीय कुटुंबातील रहिवाशी मनीष कुंदन कश्यप (34) या रुग्णाला त्याची बहीण मध्यप्रदेश येथील बुऱ्हानपूर रहिवासी चंचल सचिन सिकरवार (37) यांनी किडनी देऊन जीवनदान दिले. बहिणीने भावाला किडणीदान करून जणू भावाला भाउबिजेची भेट दिली.



मनीष कश्यप गेल्या एक ते दीड वर्षापासून नेपरोलॉजिस्ट डॉ. निखिल बडनेरकर यांच्या देखरेखीखाली उपचार व डायलिसिस घेत होते. त्यानंतर शिवाजी शिक्षण संस्थेचे अध्यक्ष भैय्यासाहेब उर्फ हर्षवर्धन देशमुख, महाविद्यालयाचे अधिष्ठाता डॉ. अनिल देशमुख, वैद्यकीय अधीक्षक डॉ. पवन टेकाडे, डॉ. सोमेश्वर निर्मळ यांच्या मार्गदर्शनाखाली शस्त्रक्रियेचे नियोजन करण्यात आले. त्यानंतर ही शस्त्रक्रिया यशस्वीरित्या पार पडली. शस्त्रक्रिया चमूमध्ये यूरोलॉजीस्ट डॉ. राहुल पोटोडे, डॉ. विक्रम देशमुख यांच्या नेतृत्वाखाली डॉ. विशाल बाहेकर, डॉ. राहुल घुले, डॉ. श्वेता आठवले, नेपोलॉजीस्ट डॉ. निखिल बडनेरकर, डॉ. स्वप्नील मोलके, डॉ. प्रणित काकडे, बधीरीकरण तज्ञ डॉ. विजया पाटील, डॉ. शशि चौधरी, डॉ. नंदिनी देशपांडे, डॉ. मीनल कोकाटे, डॉ. जयेश इंगळे, डॉ. शिरीष माहोरे, डॉ. रितेश म्हात्रे, डॉ. श्रद्धा धाकुलकर, डॉ. स्वप्नील नागे, डॉ. निशा राठी, डॉ. मधुरा अत्रे यांचा मोलाचा वाटा होता.

### म.फुले जन आरोग्य योजनेत मोफत शस्त्रक्रिया

ही अत्यंत महागडी असलेली शस्त्रक्रिया शासनाच्या महात्मा ज्योतिबा फुले जन आरोग्य योजनेअंतर्गत संपूर्ण मोफत करण्यात आली. तसेच शस्त्रक्रिया पूर्वी देखील बऱ्याच चाचण्या रुग्णालय स्तरावर मोफत करण्यात आल्यामुळे रुग्णाला बराच दिलासा मिळाला .रुग्ण व रुग्णांच्या कुटुंबीयांनी शस्त्रक्रियेबाबत समाधान व्यक्त केले. किडनी ट्रान्सप्लांट अवघड असलेली शस्त्रक्रिया पहिल्यांदाच डॉ पंजाबराव देशमुख वैद्यकीय महाविद्यालयात यशस्वीरित्या पूर्ण झाल्याबद्दल संस्थेचे अध्यक्ष हर्षवर्धन देशमुख व पदाधिकारी यांनी डॉक्टर व संपूर्ण टीमचे अभिनंदन केले.

शस्त्रक्रिया दरम्यान शस्त्र गृहात संध्या वाघमारे, शितल अंबरते , प्रियंका मैंद, सुमित्रा घाडगे, कल्याणी निरडकर, प्रतीक मालविया, मोहिनी गोहत्रे ,पुष्पलता बेहरड, राणी खेकडे ,अंकुश दळवी विकास चरोडे, नीता श्रीखंडे यांनी काम पाहिले, तर किडनी ट्रान्सप्लांट आयसीयूमध्ये पुढील दहा दिवस डॉ सतविर कौर, लीना ठाकूर ,शिल्पा वानखडे, स्मिता वावरे, शशिकांत ढीवर, डेलिया मेघवा, पल्लवी कपळे, पल्लवी निस्वादे, त्रिशुला मनोहरे, अर्चना वानखडे हे कार्यरत राहणार आहेत. प्राधिकरण समितीकडून रुग्ण व डोनर यांची संपूर्ण कागदपत्राची पडताळणी करून त्यांच्यासोबत मुलाखतीच्या माध्यमातून संवाद साधून सर्व बाबीची पडताळणी केली व शस्त्रक्रिया करण्याकरता मान्यता दिली. पाच तास चाललेली हि शस्त्रक्रिया यशस्वी पूर्ण झाली.

# तूरीवर अळीचा प्रादुर्भाव

## शेतकरी पुन्हा संकटात

**महासागर प्रतिनिधी**

**अमरावती,( दि.22 ) -** उशिरा का होईल हिवाळ्याला सुरुवात झाली. मात्र असे असतानाही तुर पिकांवर अळीचा प्रादुर्भाव वाढला आहे. यामुळे हाताशी आलेले तुरीचे पीक जाण्याची भीती शेतकऱ्यांमध्ये व्यक्त होत आहे. खरिपानंतर आता रब्बीतही शेतकऱ्यांसमोर संकटांची मालिका सुरूच असल्याचे दिसून येत आहे.

जिल्ह्यात खरीप हंगामात सततच्या पावसामुळे व अतिवृष्टीमुळे सोयाबीन पीकांना फटका बसला. आता वातावरण बदलामुळे तुरीची फुले गळु लागली असून, शेतकऱ्यांजवळ कोणताही पर्याय नाही. पिकांवर किडी व अळींचा प्रादुर्भाव होत आहे. अचानक वातावरण बदलामुळे तुरीवर किडींचा प्रादुर्भाव वाढला असून, फुलांची मोठ्या प्रमाणात गळती सुरू झाली आहे. यामुळे चिंताग्रस्त असलेले शेतकरी विविध प्रयोग करून वाचविण्याचा पीक प्रयत्न करीत असल्याचे दिसत आहे. त्यामुळे तुरी पिकाचे मोठ्याप्रमाणात नुकसान होत आहे, तर सोयाबीनला बाजारभाव नसल्यामुळे खरीप हंगामात केलेला खर्च निघण्याची आशाही मावळली आहे. आता तुरीचे पीक बहरात आले असताना काही दिवसांपासून वातावरणात दररोज बदल होत असल्याने तुरीवर अळीचा प्रादुर्भाव झाला आहे. त्यामुळे शेतकरी चांगलाच अडचणीत आला आहे.



### दुहेरी संकट

यंदाच्या खरीप हंगामात उत्पन्नापेक्षा खर्च जास्त झाला. शेतीमालाचे नुकसान व शेतमालाला कमी भाव मिळत असल्याने शेतकरी दुहेरी संकटात सापडला आहे. तुरीचे पीक शेंगा व फुलावर असतानाच वातावरण बदलामुळे धोक्यात आले आहे. पाने खाणारी अळी शेंगा पोखरणारी अळी आदी किडींचाही प्रादुर्भाव पिकावर झाला आहे. त्यामुळे पीक उत्पादनात मोठी घट होण्याची भीती असल्याने शेतकरी चिंताग्रस्त झाले आहेत. त्यामुळे कृषी विभागाने शेतकऱ्यांना मार्गदर्शन करून अळी व कीड नियंत्रणासाठी उपाययोजना करण्याची मागणी होत आहे.